# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०२/२०२५ (बुधवार) सकाळ**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्याा आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

पोलीस स्टेशन पारशिवणी :– दिनांक २५/०२/२०२५ **रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की,** मौजा सकरला शिवार ,दिलीप चौधरी यांचे चहा टपरीच्या मागे खुल्या जागेत काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी क्र. १) मोहन सोनबाजी सहारे, वय ४८ वर्षे, रा. सालई ता. पारशिवणी,२) प्रदीप घनशामजी टिकमकर, वय ४२ वर्षे, रा. सावळी ता पारशिवणी,३) चंद्रशेखर शालीक पंधराम, वय ३२ वर्षे, रा. टेकाडी ता. पारशिवणी,४) दिलीप राजकुमार चौधरी, वय ३६ वर्षे, रा. सकरला ता. पारशिवनी हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.आरोपीतांच्या ताब्यातुन **५२ तास पत्ते किंमती ४० /– रूपये, रोख रक्कम १७,९८०/–रूपये, तीन ॲंड्रॉइड मोबाईल किंमती** ३३,०००/– रूपये, तीन मोटर सायकल किं. १,४०,०००/– रूपये असा **एकुन** १,९१,०२०/– **रूपयांचा मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## मा.मुख्यमंत्री यांचे १०० दिवसीय उपक्रमांतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात विदयार्थीनींना देण्यात आले स्वसंरक्षणाचे धडे

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसीय उपक्रमांतर्गत पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत दिनांक २५/०२/२०२५ रोजी लालबहादुर शास्त्री महाविदयालय, पारशिवनी येथे विदयार्थीनींना स्वसंरक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले.याकरिता सरोजिनी पब्लिक स्कूल,

पारशिवनी येथिल शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती हर्षाली घाटोळे, उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थीनीना स्वसंरक्षण प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच आणीबाणीच्या प्रसंगी स्वत:चे संरक्षण कसे करायचे याचे धडे दिले. विद्यार्थीनींना ७० विदयार्थीनींना स्वसंरक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर